जा.क्र.प्राअवि/एनसीटीई/२००७-०८/न.अ.वि./२५३९
अति.तु./ डीएड प्रवेशकक्ष/महाराष्ट्र राज्य शैक्षणिक
संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे ३०
दिनांक : २५ /१०/२००७

प्रति,

प्राचार्य,

महाराष्ट्र शिक्षण मंडळ लातूरद्वारा संचालित
संगमेश्वर डीएड कॉलेज, केंद्रे बिल्डींग, शिवनगर ता. जि. लातूर

विषय :- **<u>सन २००७-०८ या वर्षाकरिता नवीन अध्यापक विदयालय / अतिरिक्त तुकडीस कायमविना अनुदानित तत्वावर मान्यतेबाबत...</u>**

संदर्भ :- १) एन.सी.टी.ई. भोपाळ यांचे पत्र क्र. APWO/4022/122878
दिनांक 6/7/2007
२) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग यांचे प्रवेश परवानगीचे आदेश दिनांक - क्र.टिसीएम-२००७/(३७०/०७) माशि ४ दि.८/१०/०७

एन.सी.टी.ई. भोपाळ यांनी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेत नवीन अध्यापक विद्यालय सुरु करण्यासाठी काही अटी आणि शर्तीच्या अधीन राहून सन २००७-०८ पासून नवीन अध्यापक विद्यालयास / अतिरिक्त तुकडीस परवानगी देण्यात आलेली आहे. खालील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन अ.वि. च्या व्यवस्थापनाने करावे, त्याचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१) एन.सी.टी.ई. भोपाळ यांनी विहित केलेल्या निकषांचे तंतोतंत पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी.

२) विहित अर्हताधारक व अनुभवी प्राचार्य व अध्यापक यांची NCTE च्या व महाराष्ट्र शासनाच्या निकषानुसार तसेच महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) मधील तरतूदीस अधीन राहून नेमणुक करावी. वय वर्ष ५८ पेक्षा जास्त वयाचे प्राचार्य किंवा अध्यापकांची नेमणूक करता येणार नाही.

३) नेमलेल्या सर्व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विभागीय शिक्षण उपसंचालक यांची मान्यता घेण्यात यावी.

४) प्रवेशाच्यावेळी प्रचलित शासन धोरणानुसार व महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक सूचनानुसार प्रवेश करण्यात येतील.

५) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेशी सातत्याने संपर्क ठेवून आवश्यक ते मार्गदर्शन घेतले जावे व त्यांच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

६) अध्यापक विद्यालय विनियमन प्रधिकरण, पुणे (द्वारा - महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे - ३०) यांचेकडे ३० डिसेंबर २००७ पूर्वी शुल्क निश्चितीबाबतचा प्रस्ताव विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेमार्फत सादर करावा.

७) नियमाप्रमाणे अनुज्ञेय व्यवस्थापनाच्या प्रवेशांच्या जागा भरण्यास आपणास परवानगी देण्यात येत आहे. व्यवस्थापनाच्या जागा भरताना कोणतेही शासकीय नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

८) व्यवस्थापन कोटा भरताना कोणतेही शासकीय नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी. व्यवस्थापन अगर शासकीय कोटयातील प्रवेश देताना कोणाही उमेदवारांकडून डोनेशन/ देणगी अथवा निर्धारीत शुल्कापेक्षा जादा शुल्क घेतले जाणार नाही याची काळजी घेतली जावी. याबाबत कोणतीही तक्रार आल्यास महाराष्ट्र कॅ.फी ॲक्ट १९८७ मधील कलमांच्या तरतुदीनूसार संबंधित अ.वि./व्यवस्थापनावर कारवाई केली जाईल.

९) दरवर्षी एन.सी.टी.ई. ला स्टाफ प्रोफाईल विहित नमुन्यात संचालकांच्या प्रतिस्वाक्षरीसह सादर करण्यात यावेत.

१०) महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेला अभ्यासक्रम, मूल्यमापन पध्दती, प्रात्यक्षिक कार्य इ. बाबींचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक असेल.

*११) चालू शैक्षणिक वर्ष २००७-०८ मध्ये आपल्या अध्यापक विद्यालयात केंद्रीय प्रवेश विभाग स्तर व राज्यस्तरावरून करण्यासाठी प्रवेश प्रक्रिया शुल्क प्रति तुकडी प्रमाणे शासनाच्या क्र.टिसीएम-२००७/(३७०/०७) माशि ४ दि.८/१०/०७ अन्वये रू. १,००,०००/- (रूपये एक लाख फक्त) शुल्काचा डी.डी. अध्यक्ष राज्यस्तरीय डी.एड. प्रवेश निवड निर्णय तथा नियंत्रण समिती पुणे यांच्या नावे पुणे येथे दि.१८/१०/०७ पर्यंत जमा करावा.

१२) अ.वि. चालविताना ते सुरळीत चालावे म्हणून संबंधित जिल्हयाचे प्राचार्य, डाएट, विभागीय शिक्षण उपसंचालक, संचालक, म.रा.शै.सं.प्र.प. यांचे वेळोवेळी मार्गदर्शन घेऊन कार्यवाही केली जाईल.

१३) सदर अध्यापक विद्यालयास महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची संलग्नता घेणे बंधनकारक राहील. सोबत दिलेल्या नमुन्यात रू.१००/- च्या स्टॅम्पवर लेखी हमीपत्र विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे सादर करावे.

१४) तपासणी अहवालातील खालील अटींच्या पुर्ततेच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे. अध्यापक विद्यालय सुरू झाल्यापासून ३ महिन्याच्या आत अटींची पुर्तता करावी.

१) ______________________________

२) ______________________________

३) ______________________________

४) ______________________________

## अध्यापक विद्यालयाचा तपशील

| संस्थेचे नाव, अध्यापक विद्यालयाचे नाव व ठिकाण (पत्ता) | फोन नं., फॅक्स, ई-मेल | माध्यम | प्रकार | प्रवेश क्षमता | मान्यतेचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र शिक्षण मंडळ, लातूरद्वारा संचालित संगमेश्वर डीएड कॉलेज, शिवनगर ता. जि. लातूर | | मराठी | मिश्र | ४०+१० | २००४-०५ |

स्थळप्रत मा. संचालक यांचे स्वाक्षरीत

संचालक
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, पुणे ३०. करिता.

प्रत :

१) मा.सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सादर.

२) विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग लातूर यांना कार्यवाहीसाठी.

३) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, मुरुड, जि. लातूर यांना पुढील कार्यवाहीसाठी.

४) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे १.

५) डी.एड. प्रवेश कक्ष (अध्यापक विद्यालयांच्या सुधारीत यादीसाठी).

संस्थेचे नांव व पत्ता

_______________

_______________

# हमीपत्र

मी संस्थेचा अध्यक्ष/सचिव खालील हमीपत्र लिहून देत आहे की NCTE यांचे पत्र क्र. ----------------------- नुसार आमच्या संस्थेने ------- या माध्यमाचे नवीन अ.वि./अतिरिक्त तुकडी वाढ मिळाली असून खालीलप्रमाणे अटी मान्य आहेत.

**मुद्दे :-**

१) आमची संस्था शासनाकडे भविष्यात कधीही अनुदानाची मागणी करणार नाही.

२) NCTE च्या कायद्याचे / नियमावलीचे पालन करील.

३) महाराष्ट्र शासनाचे आदेश, SCERT परीक्षा परिषद व शिक्षण संचनालयाचे वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन केले जाईल.

४) डी.एड.प्रवेश अध्यापक विद्यालय विनियमन प्राधिकरणाकडून निश्चित केलेल्या शुल्कानुसारच फीची आकारणी केली जाईल त्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारे जादा डोनेशन/फी आकारली जाणार नाही.

५) शासनाने ठरवून दिलेला विहीत अभ्यासक्रम, प्रात्यक्षिके, तात्विक भाग व विविध उपक्रम काटेकोरपणे छात्र विद्यार्थ्यांकडून केले जाईल.

६) दरवर्षी ३१ डिसेंबरपूर्वी स्टाफ प्रोफाईल (कर्मचारी सूची) वि.उपसंचालक यांचेकडून मान्य करून SCERT संचालक यांची प्रती स्वाक्षरी घेऊन NCTE ला पाठविले जाईल.

७) वि.शि.उ.सं.व डायट प्राचार्य यांनी मागितलेली माहिती वेळेत व बिनचुकपणे देण्यात येईल.

८) शासन आदेशानुसारच व्यवस्थापन कोटा भरला जाईल व त्याला वेळीच सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेण्यात येईल.

९) संस्थेस नियमानुसार विहित असलेल्या व्यवस्थापन कोटयाच्या संख्यएवढेच आणि व्यवस्थापन कोटयातील प्रवेश भरण्याच्या विहित नियमांस अधीन राहूनच व्यवस्थापन कोटयातील प्रवेश देण्यात येतील याची आम्ही हमी देतो.

१०) वेळोवेळी होणाऱ्या शासनाच्या आदेशानुसार प्रशिक्षणासाठी प्राध्यापकांना स्वखर्चाने पाठविण्यात येईल.

११) NCTE ने विहीत केलेल्या पात्रतेचे प्राचार्य शिक्षक विहित संख्येएवढेच नियुक्त केले जातील.

१२) शासनाच्या नियमाचे पालन केले नाही तर सदर विद्यालयाची मान्यता काढून घेण्याची कार्यवाही करण्यात येईल याची आम्हास जाणीव आहे.

१३) सदरचे हमीपत्र जिल्ह्याच्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्यांचे स्वाक्षरीने संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे सादर करावे.

**संस्थेचे अध्यक्ष** **सचिव**

१) स्वाक्षरी :

२) नांव :

३) पूर्ण पत्ता :

४) दूरध्वनी :